नियमित दिवाणी मुकदमा क्र. २७/२०२२
( श्री.कृष्णा पालव विरुध्द श्री.संदीप सावंत)

**:– नि. ३९ खालील आदेश –:**

सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी नि.३९ सोबत दाखल केलेले कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांचे अर्जातील कथन असे की, सदरची कागदपत्रे ताकीद अर्ज चौकशीच्या दृष्टीने अंत्यत महत्वपूर्ण आहेत. सदरची कागदपत्रे ही पूर्वीच्या कोर्ट कामकाजामधील सहीसुद नक्कला आहेत. सबब सदरची कागदपत्रे दाखल करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. वादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतली आहे. वादी यांचे कथन असे की, नि. ५ चे युक्तीवादाचे वेळी सदरचे कागदपत्र अचानकपणे दाखल केलेले आहेत. सबब सदरचे कागदपत्र याकामी दाखल करुन घेता येणार नाहीत.

४. अर्ज व म्हणणे वाचून पाहीले, अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. तसेच उभय पक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी यांनी नि. ३९ चे फेरीस्तासोबतची कागदपत्रे ही ताकीद अर्ज चौकशीकामी दाखल केलेली असलेने प्रतिवादीच्या कथनाप्रमाणे सदरील कागदपत्र ताकीद अर्ज चौकशी व युक्तीवादाच्या दृष्टीने आवश्यक आहे.

५. प्रस्तुतची कागदपत्रे ही न्यायालयीन कामकाजातील सहीसुद नक्कला आहेत. त्यामुळे प्रस्तुतचे कागदपत्र दावा गुणदोषावर न्यायनिर्णीत करण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहेत असे दिसून येते. सबब सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. यानुसार मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. नि. ३९ कडील अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. नि. क्र.४० येथील फेरीस्तासोबतची दाखल करणेत आलेली कागदपत्रे अभिलेखावर दाखल करणेची परवानगी देणेत येत आहे.

PAWAN RAMBHAU DHORE
Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.10.14 15:28:03 +0530

दिनांक– १४/१०/२०२४

(प.रा.ढोरे )
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
कुडाळ.